महाराष्ट्र टाइम्स

# सार प्रवेशाचा सेतू

महाराष्ट्र टाइम्स| May 28, 2019, 12.24 PM IST

इंजिनीअरिंग किंवा मेडिकल या क्षेत्रांसोबत तब्बल ५२ अभ्यासक्रमांची माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध करून देणारे 'सार' हे ऑनलाइन पोर्टल खऱ्या अर्थाने प्रवेशप्रक्रिया आणि विद्यार्थ्यांमधील 'सेतू' बनणार आहे. इतकेच नव्हे, तर अगदी प्रवेशअर्ज भरण्यापासून ते कॉलेजमध्ये ऑनलाइन फी भरण्यापर्यंत प्रत्येक प्रक्रियेत राज्य प्रवेशप्रक्रिया कक्षाचे 'सेतू' विद्यार्थी-पालकांसाठी आधार ठरणार आहे. हा हक्काचा आधार नेमका कसा आणि कुठे मिळवायचा, हे सांगण्यासाठी खास 'सेतू'च्या मार्गदर्शकांच्या टीमने 'मटा प्लॅनेट कॅम्पस'च्या व्यासपीठावर हजेरी लावली होती. यावेळी या टीमतर्फे मार्गदर्शक कमलाकर जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले...

**अचूक करिअर मार्गदर्शन** सेतू केंद्रांवर विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने कोणते योग्य पर्याय उपलब्ध आहेत याची माहितीसुद्धा उपलब्ध असणार असून वेळप्रसंगी विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले जाणार आहे. आपल्याला मिळालेल्या गुणांनुसार आपल्यासाठी कोणते क्षेत्र योग्य आहे, याची माहितीसुद्धा सेतू केंद्रावरून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्याचसोबत विद्यार्थ्यांना किचकट वाटणाऱ्या प्रवेशप्रक्रियेत प्रवेशअर्ज भरणे, आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करणे यांसारखी महत्त्वाची कामे सेतू केंद्रावर केली जाणार आहेत.

**सेतूची वॉररूम!** एकाचवेळी विविध ठिकाणांहून लाखो विद्यार्थ्यांसाठी सज्ज राहण्यासाठी सेतू टीमने खास वॉररूमची निर्मिती केली आहे. अर्थात या वॉररूममधून विद्यार्थ्यांच्या प्रत्यके शंकांचे निरसन केले जाणार आहे. यासाठी सेतू केंद्राने निर्माण केलेल्या 'सार' पोर्टलवर सेवा उपलब्ध असणार आहे. मात्र, www.maha2019cap.org या पोर्टलवर विद्यार्थ्यांना नोंदणी करणे अनिवार्य असून साधारणतः जूनच्या पहिल्या आठवड्यापासून हे पोर्टल कार्यरत होईल.

**अतिरिक्त माहितीचा आधार**

सेतू समुपदेशन केंद्रांवर व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती देणे, ते अभ्यासक्रम असणाऱ्या कॉलेजांची मागील वर्षांची कटऑफ, प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व या कॉलेजांचा असणारा रँक या सर्व गोष्टींविषयीची महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळू शकणार आहे.

**टेक्नोसॅव्ही रूम**

राज्यभरातील प्रत्येक सेतू केंद्र हे तंत्रज्ञांच्या दृष्टीने पूर्णपणे सुसज्ज असणार असून प्रत्येक केंद्रांवर स्कॅनर व प्रिंटर यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची कागदपत्रांसाठी होणारी धावपळ तसेच इतर कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेतली जाणार आहे.

**प्रवेश होईपर्यंत 'एक'साथ!**

या पोर्टलवर नाव नोंदवताना तुम्ही ज्या सेतू केंद्राची निवड कराल त्याच केंद्राशी शेवटपर्यंत बांधील राहणे बंधनकारक राहणार आहे. कारण विद्यार्थ्यांशी निगडित सर्व प्रक्रिया कागदपत्रे, माहिती तसेच इतर बाबी या संबंधित केंद्र आणि मार्गदर्शकांच्या अखत्यारित असतील. त्यामुळे कुठलाही घोळ होणार नाही यादृष्टीने शेवटपर्यंत केंद्र बदलू नये, अशी सूचना करण्यात आली आहे.

**कॅपमधून मार्गदर्शकासमवेत सुरुवात** संपूर्ण प्रक्रियेची सुरुवात सार पोर्टलवरून होईल. तुम्हाला सेतू केंद्रातील मार्गदर्शकासोबत पाठवले जाईल; त्यानंतर संबंधित कॅपच्या अर्जातून तुमची प्रत्यक्ष प्रवेशप्रक्रिया सुरू होईल. तुमच्या कागदपत्रांचे कोडिंग सार पोर्टलवर करण्यात येईल. त्यामुळे तुम्ही जी कागदपत्रे पोर्टलवर टाकणार आहात त्याची तपासणी तुम्ही सेतू सुविधा केंद्रावर जाऊन करून घेणे गरजेचे आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने तुमची सेतू प्रवेशप्रक्रिया पूर्ण होईल.

(संकलन: सौरभ शेलार)